# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 26 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २६ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- महाविकास आघाडीच्या तीनही प्रमुख घटक पक्षांसह भाजपकडूनही दुसरी उमेदवार यादी जाहीर
- राज्यात २४ जिल्ह्यांमध्ये ९१५ शॅडो मतदान केंद्र उभारण्याचा निवडणूक विभागाचा निर्णय
- नांदेडच्या ५२ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत परभणी इथं राष्ट्रीय छात्र सेना प्रशिक्षण शिबीर

आणि

- पुणे क्रिकेट कसोटीत भारताचा ११३ धावांनी पराभव करत न्यूझीलंडची मालिकेत विजयी आघाडी

****

महाविकास आघाडीतल्या तीनही प्रमुख घटक पक्षांनी आज आपली दुसरी उमेदवार यादी जाहीर केली. काँग्रेसच्या २३ उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत जालना मतदारसंघातून कैलास गोरंट्याल, औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून मधुकर देशमुख, निलंगा मतदारसंघातून अभयकुमार पाटील, यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या १५ उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत हिंगोली मतदारसंघातून रुपाली पाटील, परतूर मतदारसंघातून आसाराम बोराडे, धुळे शहर मतदारसंघातून अनिल गोटे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं २२ उमदेवारांची दुसरी यादी जाहीर केली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत ही नावं जाहीर केली. या मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंगापूर इथून सतीश चव्हाण, बीड मधून संदीप

क्षीरसागर धाराशिव जिल्ह्यात परांडा इथून राहुल मोटे, येवला - माणिकराव शिंदे, तर अहिल्यानगर शहर मतदार संघातून -अभिषेक कळमकर, माळशिरस- उत्तमराव जानकर, फलटण -दीपक चव्हाण, चंदगड- नंदिनी भाबुळकर-कुपेकर, इचलकरंजी- मदन कारंडे यांचा समावेश आहे.

****

भाजपनेही आज २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. यामध्ये नाशिक मध्य मतदार संघातूनन देवयानी फरांदे, जत मतदार संघातून गोपीचंद पडळकर, वरोरा इथून करण संजय देवतळे, धुळे ग्रामीण - राम भदाणे, लातूर ग्रामीण-रमेश कराड तर पंढरपूर मतदार संघातून समाधान औताडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

प्रहार जनशक्तीचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मुंबई इथं प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गावंडे यांचे स्वागत करत त्यांची भाजपा प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली. गावंडे यांचे सहकारी आमदार प्रकाश डहाके आणि यांच्या सुविद्य पत्नी सई डहाके यांनीही यावेळी भाजप पक्षात प्रवेश केला.

****

मनसेचे मुंबईतल्या माहिम मतदार संघाचे उमेदवार अमित ठाकरे यांना समर्थन देण्यासाठी महायुतीच्या नेत्यांशी चर्चा करणार असल्याचं मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. यासाठी शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचं शेलार यांनी सांगितलं.

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. महाविकास आघाडीत झालेल्या जागांच्या वाटपात काही जागांची अदलाबदल होऊ शकते का, या या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती थोरात यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

****

विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवार देण्याऐवजी महाराष्ट्र स्वराज्य पक्ष या नोंदणीकृत पक्षाच्या चिन्हावर उमेदवार उभे करावेत, असा प्रस्ताव स्वराज्य पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्याकडे मांडला आहे. छत्रपती संभाजीराजे यांनी आज अंतरवाली सराटी इथं मनोज जरांगे यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली.
दरम्यान, शिवसेना नेते उदय सामंत यांनीही आज मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाररथाला आज अध्यक्ष अजित पवार यांनी हिरवा झेंडा दाखवला. यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादीने आपल्या प्रचारासाठी ही एक विशेष एलईडी व्हॅन तयार केली असून या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचा प्रचार करण्यात येणार आहे. महायुतीच्या काळात राबवलेल्या विविध योजना मतदारांना दाखवण्यात येणार आहेत.

****

आगामी विधानसभा निवडणूकांसाठी मुख्य निवडणूक विभागामार्फत राज्यात एकूण २४ जिल्ह्यांमध्ये ९१५ शॅडो मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. रत्नागिरी जिल्हयात सर्वाधिक २३२ शॅडो मतदान केंद्र तर सांगलीत १ शॅडो मतदान केंद्र असणार आहेत. मराठवाड्यातल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात नऊ, बीड इथं बावीस आणि नांदेड इथं बारा शॅडो मतदान केंद्र उभारण्यात येणार असल्याचं विभागामार्फत सांगण्यात आलं. मतदानाच्या दिवशी विशेष मेसेंजर, वॉकी-टॉकी, व्हीएचएफ, वायरलेस सेंटर, वायरलेस कम्युनिकेशन सेवा, सॅटेलाईट फोन, वने आणि पोलीस विभागाचा रनर या विशेष सेवा शॅडो मतदान केंद्रात कार्यरत असतील. याशिवाय बीएसएनएलमार्फत पर्यायी संदेश वहनाची यंत्रणाही कार्यरत असेल.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज मुंबई शहर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११५वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन सकाळी ११ वाजता या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

****

परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यातील ५२ महाराष्ट्र बटालियन नांदेड अंतर्गत परभणी इथं राष्ट्रीय छात्र सेनेचं प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आलं आहे. या शिबीरात ड्रिल, फायरिंग, शस्त्र ओळख तसंच प्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, गस्त घालणं, घात लावणं आदींचं प्रशिक्षण देण्यात येत आहे. या शिबीरात ४६९ एन.सी.सी. कॅडेट्स सहभागी झाले असल्याची माहिती कर्नल एम. रंगा राव यांनी दिली.

****

गडचिरोली जिल्ह्यातल्या हेमलकसा इथल्या पद्मश्री डॉक्टर प्रकाश आमटे यांच्या लोकबिरादरी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी नागपूर विभागीय शालेय मल्लखांब, रोप मल्लखांब, खो-खो स्पर्धा तसंच गडचिरोली इथं झालेल्या १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या विभागीय खो खो स्पर्धेतही विजेतेपद पटकावलं आहे. लोकबिरादरी आश्रमशाळेच्या १३ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. या खेळाडूंचं डॉ.प्रकाश आमटे, डॉ.मंदाकिनी आमटे यांनी अभिनंदन केलं आहे.

****

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान सुरू असलेल्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज न्युझीलंड संघानं ११३ धावांनी जिंकला. आज तिसऱ्या दिवशी न्युझीलंडचा दुसरा डाव २५५ धावांवर आटोपला. न्यूझीलंडनं पहिल्या डावातल्या १०३ धावांच्या आघाडीसह भारताला विजयासाठी ३५९ धावांचं आव्हान दिलं होतं. भारताचा दुसरा डाव २४५ धावांवर आटोपला. यशस्वी जैस्वालनं सर्वाधिक ७७ धावा केल्या. या मालिकेत न्यूझीलंडच्या संघानं २-०

अशी विजयी आघाडी घेतली आहे. तत्पूर्वी भारताचा पहिला डाव १५६ धावांमध्येच संपुष्टात आला होता.

****

मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा भाग म्हणून, हिंगोली इथं स्वीप समितीमार्फत शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून संकल्प पत्र भरून घेण्यात येत आहेत. या संकल्प पत्रातून विद्यार्थी आपल्या पालकांना मतदान करण्याबाबत आग्रह करत आहेत. आज अनेक विद्यार्थ्यांनी ही पत्रं शाळेत सादर केली. या पत्रातला मजकूर विद्यार्थ्यांनी वाचून दाखवला.

***बाईट***

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर नगर परिषदेच्या प्राथमिक शाळा क्रमांक दोन मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना एसएमएस तसंच व्हाट्सअप वर संदेश पाठवून मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. गटशिक्षणाधिकारी मेहरुबा इनामदार आणि मुख्याध्यापक गणेश रोचकरी यांच्या मार्गदर्शनात शिक्षकांच्या मोबाईलवरून विद्यार्थ्यांनी हे संदेश पाठवले आहेत.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात पाथर्डी इथल्या श्री सच्चिदानंद बंडोबा महाराज माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे मतदानाचा संदेश देत जनजागृती केली. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी मानवी साखळीद्वारे 'से येस टू वोट' हा संदेश तयार केला. ३०० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. यावेळी शाळेत रांगोळी, निबंध, चित्रकला अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलं.

****

मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य उत्साहाने पूर्ण करावं, असं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे. नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाच्या कौठा इथं झालेल्या पहिल्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते आज बोलत होते. या प्रशिक्षणात ८८४ मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

****